**राष्ट्रीय सहकारी विकास निगम योजनेअंतर्गत असफान यंत्रमाग गारमेंट औद्योगिक सहकारी संस्था लि.,. नळदुर्ग, ता. तुळजापूर,जि. उस्मानाबाद या यंत्रमाग सहकारी संस्थेस भागभांडवल व कर्ज वितरीत करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग**
**शासन निर्णय क्र. यंत्रमाग- २००९/प्र.क्र.२६१/टेक्स-२**
**१६ वा मजला, नवीन प्रशासकीय भवन,**
**हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**
**दिनांक :- २ मार्च, २०१९.**

**वाचा :-**

१) शासन निर्णय, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग क्रमांक:- यंत्रमाग-१३९८/प्र.क्र.१५८/ टेक्स- २, दिनांक २४ फेब्रुवारी, १९९९.
२) शासन निर्णय, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग क्रमांक:- यंत्रमाग-१३०६/प्र.क्र.१४१/टेक्स-२, दिनांक २२ जानेवारी, २००९.
३) संचालक (वस्त्रोद्योग), वस्त्रोद्योग संचालनालय, नागपूर यांचे पत्र क्रमांक:- कार्या-४/रासविनि/प्र.ह./४२४३/०९, दिनांक ३१ जुलै, २००९.
४) राष्ट्रीय सहकारी विकास निगम यांचे पत्र क्रमांक:- एनसीडीसी ५-१६/२०१३-एचएलएम (पीएल)/३७३/एसए ३०२६६, दिनांक ३ एप्रिल, २०१४.
५) शासन निर्णय सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग क्र.यंत्रमाग-२००९/प्र.क्र.२६१/ टेक्स-२, दिनांक २९ मार्च, २०१६.
६) संचालक (वस्त्रोद्योग), वस्त्रोद्योग संचालनालय, नागपूर यांचे पत्र क्रमांक:- कार्या ४/यंत्रमाग/ब-६९/८३९५/२०१८, दिनांक ६ऑगस्ट, २०१८.
७) राष्ट्रीय सहकारी विकास निगम यांचे पत्र क्रमांक:- एनसीडीसी ५-१६/ २०१३-एचएलएम(पीएल), दिनांक ८ जून, २०१८.
८) वित्त विभाग शासन परिपत्रक क्रमांक:- संकिर्ण-२०१६/प्र.क्र.३१/कोषा. प्रशा-५, दिनांक १० मे, २०१६.
९) वित्त विभाग शासन परिपत्रक क्रमांक:- अर्थसं-२०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३, दिनांक २ एप्रिल, २०१८.
१०) वित्त विभाग शासन परिपत्रक क्रमांक :- अर्थसं-२०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३, दिनांक २५ जानेवारी, २०१९.

**प्रस्तावना :-**

यंत्रमाग सहकारी संस्थांच्या विकासासाठी अर्थसहाय्य करण्याच्या दृष्टीकोनातून राष्ट्रीय सहकारी विकास निगम योजनेअंतर्गत असफान यंत्रमाग गारमेंट औद्योगिक सहकारी संस्था लि., नळदुर्ग, ता. तुळजापूर,जि. उस्मानाबाद या संस्थेच्या गारमेंट मॅन्युफॅक्चरींग घटकांसाठी (Garment Manufacturing Unit) रुपये ३५०.०० लाख (रुपये तीन कोटी पन्नास लाख फक्त) इतक्या खर्चाच्या प्रकल्पास राष्ट्रीय सहकारी विकास निगम, नवी दिल्ली यांनी त्यांच्या वाचा क्रमांक ४ येथील पत्रान्वये पुढील आकृतीबंधानुसार अर्थसहाय्य करण्यास मंजूरी दिलेली आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | सभासद वर्गणी | १०% | रु. ३५.०० लाख |
| २) | शासकीय भागभांडवल | ४०% | रु. १४०.०० लाख |
| ३) | राष्ट्रीय सहकारी विकास निगमकडून कर्ज | ५०% | रु. १७५.०० लाख |
| | एकूण | १००% | रु. ३५०.०० लाख |

राष्ट्रीय सहकारी विकास निगमच्या वरील मान्यतेनुसार सदर संस्थेच्या गारमेंट मॅन्युफॅक्चरींग घटकांसाठी (Garment Manufacturing Unit) वाचा क्र. ५ येथील शासन निर्णयान्वये प्रथम हप्त्यापोटी **शासकीय भागभांडवल रु.७०.०० लाख (रुपये सत्तर लाख फक्त) व रासविनी कर्जापोटी रु.४३.७५ लाख (रुपये त्रेचाळीस लाख पंच्याहत्तर हजार फक्त) असे एकूण रुपये ११३.७५ लाख (रुपये एक कोटी तेरा लाख पंच्याहत्तर हजार फक्त)** इतकी रक्कम मंजूर करण्यात आलेली आहे.

सदर संस्थेने वाचा क्र. ५ येथिल शासन निर्णयान्वये पहिल्या हप्त्यापोटी वितरित केलेल्या रु. ११३.७५ लाख इतक्या अर्थसहाय्याच्या ८६.३३ % रक्कमेचा विनियोग केला आहे.

राष्ट्रीय सहकारी विकास निगमने दिलेल्या मान्यतेनुसार आता सदर संस्थेस प्रकल्प उभारणीकरीता दुस-या व अंतिम हप्त्यास मंजुरी देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**<u>शासन निर्णय</u> :-**

असफान यंत्रमाग गारमेंट औद्योगिक सहकारी संस्था लि., नळदुर्ग, ता. तुळजापूर,जि. उस्मानाबाद या संस्थेच्या प्रकल्पाची उभारणी करण्यासाठी राष्ट्रीय सहकारी विकास निगमने मंजूरी दिल्यानुसार दुस-या व अंतिम हप्त्यापोटी **शासकीय भागभांडवल रु.७०.०० लाख (रुपये सत्तर लाख फक्त) व रासविनी कर्जापोटी रु. १३१.२५ लाख (रुपये एक कोटी एकत्तीस लाख पंचिवीस हजार फक्त) असे एकूण रुपये २०१.२५ लाख (रुपये दोन कोटी एक लाख पंचिवीस हजार फक्त)** इतकी रक्कम खालील अटींच्या अधीन राहुन मंजूर करण्यास याव्दारे मान्यता देण्यात येत आहे.

२. याद्वारे वितरीत करण्यात येणा-या रक्कमेचा योग्य विनियोग केल्यासंबंधीचे उपयोगिता प्रमाणपत्र संस्थेने, वस्त्रोद्योग संचालनालयामार्फत तीन महिन्याच्या आत शासनास सादर करावे, किंबहुना ही जबाबदारी संबंधीत प्रादेशिक उपसंचालक (वस्त्रोद्योग), औरंगाबाद यांची राहील.

३. सदर संस्थेने संचालनालयास प्रस्ताव सादर करतांना सादर केलेला संस्थेचा वार्षिक लेखापरीक्षण अहवाल व त्यानंतर सध्याचे आर्थिक वर्ष समाप्त होण्याचा कालावधी या दरम्यानच्या कालावधीचे वार्षिक लेखापरिक्षण अहवाल प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी संचालक (वस्त्रोद्योग), नागपूर यांची राहील. त्याप्रमाणे संचालक (वस्त्रोद्योग), नागपूर यांनी पुर्तता करुन घेवून अहवालासह वस्तुस्थिती शासनास सादर करावी.

४. प्रकल्प किंमतीमध्ये कालांतराने वाढ झाली तर वाढीव किंमतीची रक्कम संस्थेने स्वबळावर उभी करणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे संस्थेने प्रकल्प ठरलेल्या वेळी पूर्ण करण्यासाठी प्रादेशिक उपसंचालक (वस्त्रोद्योग), औरंगाबाद यांनी सातत्याने पाठपुरावा करावा. निधीचा दुरुपयोग होणार नाही याची दक्षता घ्यावी. दर तिमाहीस कामाचा आढावा घेण्याची जबाबदारी प्रादेशिक उपसंचालक (वस्त्रोद्योग), औरंगाबाद यांची राहील.

संस्थेचा प्रस्ताव दाखल करतेवेळी असलेली प्रकल्प किंमत व सध्याच्या किंमतीमध्ये झालेली वाढ यातील वाढीव किंमतीची रक्कम संस्थेने स्वबळावर उभी करणे आवश्यक आहे. प्रकल्प प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे बांधकाम /मशिनरीचे काम पुर्ण करुन घेण्याची दक्षता संचालक (वस्त्रोद्योग),नागपूर यांनी घ्यावी.

५. सदर संस्थेस यापूर्वी शासनाकडून वितरित करण्यात आलेल्या कर्जावरील व्याजापोटी देय/ अनुज्ञेय असलेली रक्कम संस्थेने भरणा केल्यानंतरच या आदेशान्वये वितरित करण्यात आलेल्या निधीची उचल संस्थेस करता येईल. सदर बाबीची पूर्तता करुन घेण्याची जबाबदारी संचालक (वस्त्रोद्योग), नागपूर यांची राहील.

६. वाचा क्रमांक १ व २ येथील शासन निर्णयातील अटी व शर्ती तसेच नव्याने लागू करण्यात आलेल्या /येणा-या सुधारीत अटी व शर्ती संस्थेवर बंधनकारक राहतील. त्याचप्रमाणे सदरील अटी व शर्तीन्वये आवश्यक कागदपत्रांची पूर्तता ३ महिन्यांत करुन घेण्याची कार्यवाही संचालक (वस्त्रोद्योग), नागपूर यांनी करावी.

अ) संस्थेची चल अचल संपुर्ण मालमत्ता (Assets) शासनास तारण (Hypothecation) म्हणून ठेवण्यात यावी.

ब) सदर संस्थेची नोंदणी ७/१२ उताऱ्यावर/ प्रॉपर्टी कार्ड तथा संबंधित कागदपत्रावर करुन घेउन त्याचे मा. राज्यपाल यांचे नांवे गहाणखत करुन तशी नोंद घेण्याची जबाबदारी प्रादेशिक उपसंचालक (वस्त्रोद्योग), औरंगाबाद यांची राहील.

क) संस्थेस देण्यात आलेल्या कर्ज व शासकीय भागभांडवल रक्कमेच्या २० टक्के इतकी संस्थेच्या संचालकांची स्व-मालमत्ता शासनाकडे तारण ठेवणे आवश्यक आहे. जोपर्यंत असे तारण प्राप्त होत नाही तोपर्यंत या आदेशाव्दारे संस्थेस मंजूर केलेल्या रक्कमेची संस्थेस उचल करता येणार नाही किंवा त्या रक्कमेवर संबंधित संस्थेस अधिकर्ष (Overdraft) काढून रक्कम खर्च करता येणार नाही. याबाबत संस्थेवर व बँकेवर संचालक (वस्त्रोद्योग), नागपूर यांनी बंधन आणावे.

ड) प्रस्तुत संस्थेच्या संचालक मंडळाची जेंव्हा जेव्हा निवडणूक होईल तेंव्हा तेंव्हा नवीन संचालक मंडळास ३ महिन्यांच्या आत संस्थेस मंजूर करण्यात आलेल्या कर्ज व शासकीय भागभांडवलाच्या रक्कमेच्या २० टक्के स्व-मालमत्ता शासनाकडे तारण म्हणून ठेवावी लागेल तसेच नव्याने नियुक्त संचालक मंडळाने असे तारण दिल्यानंतर पुर्वीच्या संचालक मंडळास तारणमुक्त करता येईल, तसेच नव्याने नियुक्त संचालक मंडळाने वरीलप्रमाणे तारण दिल्यानंतरच नविन संचालक मंडळ अस्तित्वात येईल अशी सुधारणा संस्थेच्या Bye Laws मध्ये करण्याबाबत संचालक (वस्त्रोद्योग), नागपूर यांनी आवश्यक ती कार्यवाही करावी.

इ) संचालक (वस्त्रोद्योग), नागपूर व प्रादेशिक उपसंचालक (वस्त्रोद्योग), औरंगाबाद यांनी राष्ट्रीय सहकारी विकास निगमने विहित केलेल्या अटी व शर्तीनुसार योजना राबवावी. त्यासाठी संस्थेच्या कामकाजावर व प्रकल्प उभारणीवर लक्ष ठेवून त्याबाबतच्या प्रगतीचा विहित विवरणपत्रातील तिमाही प्रगती अहवाल राष्ट्रीय सहकारी विकास निगमला तसेच शासनास वेळोवेळी सादर करावा, त्याचा आढावा संचालक (वस्त्रोद्योग), नागपूर यांनी घ्यावा.

फ) सदर संस्थेस दिनांक २६ एप्रिल,२०१८ च्या शासन निर्णयास अनुसरुन बांधकाम व यंत्रसामुग्रीकरिता ई-टेंडरींग प्रक्रीयांचे अवलंबन करणे बंधनकारक राहील तसेच विविध खरेदीच्या अनुषंगाने विहीत खरेदी पध्दतीचा अवलंब करणे बंधनकारक राहील व खरेदीची रक्कम पुरवठादाराच्या नांवे ECS व्दारे अदा करावी, याबाबतचे नियंत्रण संचालक (वस्त्रोद्योग), नागपूर यांनी ठेवावे.

ग) संचालक (वस्त्रोद्योग) यांनी शासनास सादर केलेल्या अहवालातील अटींची पुर्तता संचालक (वस्त्रोद्योग), नागपूर यांनी करुन घ्यावी.

७. संस्थेस या योजनेअंतर्गत अर्थसहाय्य मंजूर केल्यानंतर भागभांडवल, कर्ज रुपाने मंजूर करण्यात आलेले अर्थसहाय्य व कर्जावरील व्याज खाली नमूद केल्याप्रमाणे शासनास परत करणे संस्थेवर बंधनकारक आहे:-

अ) या योजनेअंतर्गत मंजूर करण्यात आलेल्या भागभांडवलाची रक्कम प्रकल्प पूर्ण झाल्याच्या दिनांकापासून आठ समान हप्त्यात आठ वर्षात शासनास परत करणे आवश्यक आहे. ही रक्कम संबंधित संस्थेने मागणी शिर्ष क्रमांक ०४२५, सहकार, ८०० इतर जमा रक्कमा, ०३ रा.स.वि.नि. कडील जमा (०४२५ ००३६) या लेखाशिर्षाखाली जमा करण्यात यावी.

ब) या योजनेअंतर्गत मंजूर केल्या जाणा-या कर्जाची रक्कम, प्रकल्प पूर्ण झाल्याच्या दिनांकापासून किंवा १ वर्षाचा Moratorium Period पूर्ण झाल्यानंतर यातील जे अगोदर घडेल तद्नंतर आठ समान हप्त्यात, आठ वर्षात परत करणे बंधनकारक असेल. कर्जाची रक्कम मागणी शिर्ष क्रमांक ६८५१, ग्रामीण व लघुउद्योग कर्जे, १०९ संयुक्त ग्रामीण व लघुउद्योग सहकारी संस्था, हातमाग व यंत्रमाग सहकारी संस्थांना कर्जे (६८५१ ०९ ००) या लेखाशिर्षाखाली जमा करण्यात यावी.

क) या योजनेअंतर्गत मंजूर केल्या जाणा-या कर्जावरील व्याज कर्ज दिल्याचे दिनांकानंतर त्या आर्थिक वर्षाचे अखेरपर्यत दिनांक ३१ मार्च पर्यंत देय असलेल्या व्याजाची राष्ट्रीय सहकारी विकास निगमने वेळोवेळी /प्रतिवर्षी मंजूर केलेल्या दरानुसार परिगणना करुन येणारी रक्कम दिनांक ३० सप्टेंबर पूर्वी भरणे संस्थेवर बंधनकारक आहे. सदर व्याजाची रक्कम प्रधान शीर्ष ००४९ व्याजाची जमा रक्कम ०४ राज्य /संघराज्य क्षेत्र शासनाच्या व्याजाच्या जमा रकमा, १९५ सहकारी संस्थांकडून व्याज, (०१) सहकारी संस्थांकडून व्याज (०१) (११) सहकारी औद्योगिक संस्था (००४९ १२२८) या लेखाशिर्षाखाली जमा करण्यात यावी.

ड) वरीलप्रमाणे भागभांडवल, कर्ज व व्याजाची रक्कम विहित मुदतीत न भरल्यास संबंधित संस्थेवर वरील व्याजाच्या रक्कमेव्यतिरिक्त वार्षिक २.५% दराने दंडनीय व्याजाची आकारणी करण्यात येईल.

८. वित्त विभागाच्या दि. २ एप्रिल, २०१८ च्या परिपत्रकातील परिच्छेद क्र. ७ मधील १ (आ), २, ३, ४, ५, ६ या प्रकरणी लागू नाहीत. परिच्छेद क्र.६अ), ६ ब), ६ क) व परिच्छेद क्र.७ मधील १ (अ),७,८,९, मधील तरतूदी या प्रकरणी लागू असून त्या अटींची पूर्तता सदर प्रकरणी होत आहे. तसेच सदर प्रकरणी परिपत्रकासोबतच्या परिशिष्टातील अ. क्र. १,२,३,४,४,५,६व ७ या प्रकरणी लागू होत नाही.

यंत्रमाग सहकारी संस्थाना मंजूर करण्यात येणारे शासकीय भाग भांडवल व रा.स.वि.नि कर्ज हे परिशिष्टातील अ.क्र.८ येथील अनुक्रमे “३२-अंशदाने ” व “५५ कर्जेव अग्रिम” या बाबीखाली मंजूर करण्यात येते. याबाबी संदर्भातील विभागाचे अभिप्राय खालील तक्त्यातील संबंधित मुद्दयांसमोर नमूद केले आहेत.

| अ. क्र. | मुद्दा | विभागाचे अभिप्राय |
|---|---|---|
| १ | योजनेस प्रशासकीय मान्यता . | होय. सदर योजनेस शासन निर्णय दि. २२.०१.२००९ अन्वये प्रशासकीय मान्यता आहे. |
| २ | निधी वितरण, शासन निर्णयातील अटी व शर्तीची पूर्तता झाल्यानंतरच होणार आहे. | होय. |
| ३ | यापूर्वी वितरीत केलेल्या निधीपैकी ७५% खर्चाचे उपयोगिता प्रमाणपत्र. | सदर संस्थेस प्रथम हप्त्यापोटी वितरित करण्यात आलेल्या शासकीय भागभांडवल रु. ७०.०० लाख व रा.स.वि.नि कर्ज रु. ४३.७५ लाख असे एकुण रु. |

| | | |
|---|---|---|
| | | ११३.७५ लाखापैकी संस्थेने रु. ९८.२१ लाख खर्च केलेला आहे. म्हणजेच संस्थेने ८६.३३ % खर्च केला आहे त्याचे उपयोगिता प्रमाणपत्र सादर केले आहे. |
| ४ | यापूर्वी वितरीत केलेल्या निधीच्या अनुषंगाने लेखापरीक्षक / महालेखापाल यांच्याकडून कोणतेही गंभीर आक्षेप नाहीत. | नाही. |
| ५ | निधी लाभार्थ्यांच्या थेट खात्यात जमा होणार आहे. | होय. |
| ६ | वस्तू खरेदी करण्यापूर्वी , यापूर्वी खरेदी केलेल्या अशा वस्तुंची नोंद Dead Stock रजिस्टरमध्ये घेण्यात आली असून त्याचा योग्य वापर झाला असून त्या पडून नाहीत, असे प्रमाणपत्र. | याबाबतची पुर्तता करुन घेण्याची जबाबदारी संचालक (वस्त्रोद्योग), नागपूर यांची राहील. |
| ७ | यामधून खरेदी होणार असल्यास प्रत्यक्ष वस्तू प्राप्त झाल्यानंतरच संबंधितांना देयक अदा केले जाणार आहे. | याबाबतची पुर्तता करुन घेण्याची जबाबदारी संचालक (वस्त्रोद्योग), नागपूर यांची राहील. |
| ८ | आवश्यक त्या ठिकाणी आदिवासी / सामाजिक न्याय विभाग यांची निधी वितरणास सहमती आहे. | लागू नाही. |
| ९ | प्रस्तुत योजनेत कोणतेही संक्षिप्त देयक प्रलंबित नाही. | या योजनेखाली कोणतेही संक्षिप्त देयक त्याच लेखाशीर्षाखाली प्रलंबित नाही. |
| १० | निधी स्वीय प्रपंची लेखा अथवा बँक खात्यात जमा न करता खर्च केला जाणार आहे. | याबाबतची पुर्तता करुन घेण्याची जबाबदारी संचालक (वस्त्रोद्योग), नागपूर यांची राहील. |

९. शासन परिपत्रक, वित्त विभाग, दि. १०.५.२०१६ अन्वये कोषागारात देयके पारीत करताना घ्यावयाच्या दक्षतेबद्दल सूचना देण्यात आल्या आहेत. त्यातील परिच्छेद- अ) मध्ये प्रशासकीय विभागांनी निधी वितरित करताना आदेशामध्ये समाविष्ट करावयाच्या बाबी नमूद केल्या आहेत. त्यानुसार सदर बाबींची पूर्तता प्रस्तुत प्रकरणी खालीलप्रमाणे करण्यात आली आहे :-

१) विभागास प्रदान वित्तीय अधिकार :- शासन परिपत्रक, वित्त विभाग, दि. ०२.०४.२०१८ सोबतच्या परिशिष्टातील अ.क्र.८ येथील " ३२ - अंशदाने व ५५ कर्जे व अग्रीम रकमा " या बाबीखालील समोर नमूद केलेल्या सर्व मुद्दयांची पूर्तता सदर प्रकरणी होत आहे.

२) मंजूर निधी :- "मागणी क्रमांक व्ही-३, ४८५१-ग्रामोद्योग व लघु उद्योगावरील भांडवली खर्च, (००)(१०९) संमिश्र ग्रामोद्योग व लघुउद्योग सहकारी संस्था, (०२) पंचवार्षिक योजनांतर्गत योजना-राज्य योजनांतर्गत योजना-(००)(०४) यंत्रमाग सहकारी संस्थांना भागभांडवली अंशदान (एनसीडीसी) (४८५१ ०५४२) ३२, अंशदाने" या लेखाशिर्षाखाली सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात रु.१२००.०० लाख इतका निधी अर्थसंकल्पित आहे. तसेच "मागणी क्रमांक व्ही -५, ६८५१, ग्रामोद्योग व लघुउद्योग यासाठी कर्जे, (००)(१०९), संमिश्र ग्रामोद्योग व लघुउद्योग सहकारी संस्था, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना (राज्य योजनांतर्गत

योजना)-(००) (२०) यंत्रमाग सहकारी संस्थांना कर्जे (रा.स.वि.म), (६८५१ ०३५९) ५५, कर्जे व आगाऊ रक्कमा" या लेखाशिर्षाखाली सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात रु.१२००.०० लाख अर्थसंकल्पित निधी विभागास प्राप्त झालेला आहे.

३) मागील ३ महिन्यांपूर्वी दिलेल्या अनुदानापैकी ७५% किंवा अधिक निधी खर्च झाला आहे:- होय. सदर संस्थेस प्रथम हप्त्यापोटी वितरित करण्यात आलेल्या शासकीय भागभांडवल रु.७०.०० लाख व रा.स.वि.नि कर्ज रु. ४३.७५ लाख असे एकुण रु११३.७५ लाखापैकी संस्थेने रु. ९८.२१ लाख खर्च केलेला आहे. म्हणजेच संस्थेने ८६.३३ % खर्च केला आहे त्याचे उपयोगिता प्रमाणपत्र सादर केले आहे.

४) ज्या लेखाशीर्षाखाली अनुदान वितरीत करण्यात येत आहे, त्या लेखाशीर्षांतर्गत एक वर्षापूर्वीचे संक्षिप्त देयक प्रलंबित नाही :- सदर लेखाशीर्षाखाली एक वर्षापूर्वीचे संक्षिप्त देयक प्रलंबित नाही.

५) स्थानिक स्वराज्य संस्थांना अनुदान देताना त्यांचेकडून राज्य शासनास येणे नाही किंवा येणे रक्कम समायोजित करण्यात आली आहे :- लागू नाही.

६) वैयक्तिक लाभार्थीचे देयक सादर करताना यादीसह व शक्यतो आधार क्रमांकासह सादर करावे :- लागू नाही.

७) बांधकाम विषयक प्रस्तावांना प्रशासकीय मान्यता देताना सक्षम अधिका-याची मान्यता घेतल्याचा उल्लेख आदेशात असावा :- यंत्रमाग सहकारी संस्थाच्या प्रकल्प बांधकामास व यंत्रसामुग्रीच्या खरेदीस मान्यता देण्याबाबत स्थापन करण्यात आलेल्या समितीची प्रकरणपरत्वे मान्यता घेऊनच सदर संस्थेचे बांधकाम व यंत्रसामुग्री खरेदी करणे बंधनकारक आहे.

८) खरेदीविषयक प्रक्रिया अद्यावत उदयोग, उर्जा व कामगार विभागाच्या क्र. भांखस- २०१४/प्र.क्र ८२/भाग- III/ उद्योग. दि. ०१.१२.२०१६ च्या शासन आदेशानुसार करावी व तसा उल्लेख प्रशासकीय मान्यतेत असावा :- खरेदी विषयक प्रक्रिया अद्यावत उद्योग, उर्जा व कामगार विभागाच्या क्र. भांखस- २०१४/प्र.क्र.८२/ भाग-III/ उद्योग. दि. ०१.१२.२०१६ च्या शासन आदेशानुसार संस्थेकडून करुन घेण्याची जबाबदारी संचालक (वस्त्रोद्योग) यांची राहील.

९) साहित्य खरेदीची रक्कम पुरवठादाराच्या नावे ECS द्वारे आहरित करावी - संस्थेने खरेदीबाबत खरेदीची रक्कम पुरवठादाराच्या नांवे ECS व्दारे अदा करावी अशा सूचना सदर संस्थेस या आदेशाव्दारे देण्यात येत आहेत.

१०. वरीलप्रमाणे मंजूर करण्यात आलेल्या भाग भांडवल व कर्जाची रक्कम आहरीत करुन संस्थेस वितरीत करण्याकरीता श्री. र. ग. बोडडू, कार्यासन अधिकारी (रोखशाखा) सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई- ३२ यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून व श्री. ब. बा. चव्हाण, सह सचिव (वस्त्रोद्योग) सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय मुंबई -३२ यांना नियंत्रण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. त्यांनी या शासन निर्णयानुसार मंजूर करण्यात आलेल्या भाग भांडवल व कर्जाची रक्कम अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई येथून काढून असफान यंत्रमाग गारमेंट औद्योगिक सहकारी संस्था लि.,. नळदुर्ग, ता. तुळजापूर,जि. उस्मानाबाद **(ASFAN YANTRAMAG GARMENT AOUDHYOGIK SAHAKARI SANSTHA MARYADIT., NALDURGA, TALUKA-TULJAPUR, DIST- OSMANABAD)** या संस्थेच्या स्टेट बँक ऑफ इंडीया, शाखा-, उस्मानाबाद, ता. जि. उस्मानाबाद, येथील खाते क्रमांक ३३९३०८४४४६५, MICR CODE-४१३००२८६४, IFSC CODE-SBIN०००१९७४,या खात्यावर RTGS व्दारे वितरीत करण्याची कार्यवाही करावी.

११. यावर होणारा खर्च पुढील लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व चालू आर्थिक वर्षी (सन २०१८-१९) करीता उपलब्ध असलेल्या अर्थसंकल्पिय तरतूदीतून भागविण्यांत यावा.

अ) भागभांडवल रुपये ७०,००,०००/- (रुपये सत्तर लाख फक्त)
मागणी क्रमांक व्ही-३
४८५१-ग्रामोद्योग व लघुउद्योग यावरील भांडवली खर्च
(००)(१०९) संमिश्र ग्रामोद्योग व लघुउद्योग सहकारी संस्था,
(०२) पंचवार्षिक योजनांतर्गत योजना-राज्य योजनांतर्गत योजना
(००)(०४) यंत्रमाग सहकारी संस्थांना भागभांडवली अंशदान
(एनसीडीसी) (४८५१ ०५४२) ३२, अंशदाने.

ब) रासविनी कर्ज रुपये १,३१,२५,०००/- (रुपये एक कोटी एकत्तीस लाख पंचिवीस हजार फक्त)
मागणी क्रमांक व्ही - ५
६८५१, ग्रामोद्योग व लघुउद्योग यासाठी कर्जे,
(००) (१०९), संमिश्र ग्रामोद्योग व लघुउद्योग सहकारी संस्था,
पंचवार्षिक योजनांतर्गत योजना (राज्य योजनांतर्गत योजना)
(००) (२०) यंत्रमाग सहकारी संस्थांना कर्जे ( रा.स.वि.म. ),
(६८५१ ०३५९) ५५, कर्जे व आगाऊ रकमा

१२. हा शासन निर्णय वित्त विभाग परिपत्रक क्रमांक अर्थसं-२०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३, दिनांक २ एप्रिल, २०१८व दिनांक २५ जानेवारी, २०१९ अन्वये प्रशासकीय विभागास प्राप्त झालेल्या अधिकारान्वये निर्गमित करण्यात येत आहे.

१३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यांत आला असून त्याचा सांकेतांक क्रमांक २०१९०३०२१५०८३०४४०२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यांत येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Gauri Rahul Mhaske

Digitally signed by Gauri Rahul Mhaske
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Co-Operation Marketing And Textiles Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=e3b06f24c3c5bb026c414c42f865f39144c21fb0f8c3a69c8e6e8dc2c5bb9ddd, serialNumber=b018ba858dd6b20cc7a84f6bc86a86d6a6e9ac3ac56c5dbfcd89f36c74de3e1f, cn=Gauri Rahul Mhaske
Date: 2019.03.02 15:10:59 +05'30'

**( गौरी रा. म्हस्के. )**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१) महालेखापाल, ( लेखापरीक्षा ) महाराष्ट्र-१ मुंबई / महाराष्ट्र-२ नागपूर.
२) महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-१ मुंबई / महाराष्ट्र-२ नागपूर.
३) सचिव (वस्त्रोद्योग), यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई ३२.
४) सह सचिव (वस्त्रोद्योग), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई.
५) कार्यासन अधिकारी (रोख शाखा) सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग. (३ प्रती)
६) व्यवस्थापकीय संचालक, राष्ट्रीय सहकारी विकास निगम, नवी दिल्ली.
७) विभागीय संचालक (पश्चिम), राष्ट्रीय सहकारी विकास निगम, ५ बी.जे.रोड,पुणे.
८) सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.

९) संचालक (वस्त्रोद्योग), वस्त्रोद्योग संचालनालय, नागपूर.
१०) प्रादेशिक उपसंचालक (वस्त्रोद्योग), औरंगाबाद.
११) जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था जिल्हा- उस्मानाबाद, ता. जि. उस्मानाबाद.
१२) अधिदान व लेखाधिकारी, मुंबई.
१३) संचालक, लेखा व कोषागारे (संगणक विभाग), नविन प्रशासकीय भवन, मुंबई.
१४) सहसंचालक, लेखा व कोषागारे, मुंबई.
१५) निवासी लेखा अधिकारी, मुंबई.
१६) नियोजन विभाग (कार्या-१४३१), मंत्रालय, मुंबई ३२.
१७) वित्त विभाग ( व्यय-२/अर्थसंकल्प-१३), मंत्रालय, मुंबई.
१८) अवर सचिव (१७-स) सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई.
१९) कक्ष अधिकारी (१६-स/९-स ), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई.
२०) ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई (२ प्रती)
२१) चेअरमन, असफान यंत्रमाग गारमेंट औद्योगिक सहकारी संस्था लि.,. नळदुर्ग, ता. तुळजापूर,जि. उस्मानाबाद
२२) निवड नस्ती (टेक्स-२)